N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** रामानंद **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0322 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/11/2021 02:27 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

   **Date From (दिनांक पासून):** 23/11/2021

   **Time Period (कालावधी):** पहर 6

   **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/11/2021

   **Time From (वेळेपासून):** 16:00 बजे

   **Time To (वेळेपर्यंत):** 16:29 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/11/2021 **Time (वेळ):** 01:45 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/11/2021 02:13 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** आर टी ओ कार्यालया समोर,जळगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** शशिकांत श्रीराम पाटील

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अँटी करप्शन ब्युरो ,जळगाव,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अँटी करप्शन ब्युरो ,जळगाव,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8766412529

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शुभम राजेंद्र चव्हाण | | | 1. कोल्हे हिल्स ,गॅस गोडाउन जवळ , जिजाउ नगर जळगाव,रामानंद,जळगाव, महाराष्ट्र,भारत |
| 2 | राम भिमराव पाटील | | | 1. अनुराग स्टेट बँक कलनी, महाबळ , जळगाव,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 10,000/रू.त्यात 2000रु. दराची एक नकली नोट व 500रु, दराच्या 16 चलनी नोटा | 10,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 10,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यातील मुळ तक्रारदार याचे वडिल नामे विलास नरहर देशपांडे यांनी ट्रॅव्हल व्यवसायासाठी मुंबई येथुन श्री अभिषेक धुखंडे रा. मुंबई याच्याकडुन त्यांच्या मालकिचे जने वापरते 49 सिटर बस क्र .MH04/FK9929 हे वाहन विकत घेतले होते सदर वाहनाचे फिटनेससाठी व सदरचे वाहन नावावर करण्यासाठी मुळ तक्रारदार हे जळगाव आर टी ओ कार्यालयात गेले असता सदर ठिकाणी मुळ तक्रारदार यांना आरोपी क्र.1 हे भेटले व त्यांनी तक्रारदार याचे वाहन आर टी ओ अधिकारी यांच्या कडुन नावावर करुन देण्यासाठी व सदर वाहनाचे फिटनेस साठी 10,000/-रु. लाच मागणी केली त्याबाबत तक्रार दार यांनी दि.23/11/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव कार्यालयात समक्ष हजर होवुन तक्रार दिली होती. सदर तक्रारीची दि.23/11/2021 रोजी सापळा अधिकारी यांनी पंच साक्षीदारा समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी क्र .1 यांनी मुळ तक्रारदार यांचे गाडीचे फिटनेस साठी व गाडी नावावर करण्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा वापर करुन तसेच आपल्या वयक्तीक प्रभावाचा वापर करुन तक्रारदार यांचे कडेस 10,000/-रु. ची लाच मागणी करुन सदर लाच रक्कम वरील नमुद तारखेस वेळी व ठिकाणी स्वता स्विकारली तसेच आरोपी क्र.2 यांनी सदर अपराधास सहाय्य करुन प्रोत्साहन दिले म्हणुन गुन्हा वगैरे मजकुरचे फिर्यादीवरून गुन्हा रजि दाखल करून मा.न्यायालयाला खबरी अहवाल पाठवून गुन्ह्याचा पुढील तपास श्री.एस.के. बच्छाव पोलिस निरिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव हे करीत आहोत वगैरे मजकुरचे फिर्यादी सविस्तर फिर्याद संगणीकृत केलेली सोबत जोडलेली आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the Investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** vijay fakirrao shinde(I (Inspector)) / POBN73044 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**
24.11.2021

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
रामानंद नगर पो स्टे जळगाव

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** vijay fakirrao shinde
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN73044

फिर्याद

रामानंद नगर पोलीस स्टेशन, जळगाव
दिनांक– २४/११/२०२१

**मी शशिकांत श्रीराम पाटील, वय ४७,व्यवसाय नोकरी, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव**

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी दि.२३.०७.२०२१ रोजी पासुन अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव येथे पोलीस उप अधिक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.२३.११.२०२१ रोजी आम्ही अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात उपस्थित असतांना तक्रारदार अभिजीत विलास देशपांडे, वय ३९ वर्षे, व्यवसाय ट्रॅव्हलींग,रा.गट नं.६२/३ए/प्लॉट नं.१ खेडी बुद्रुक ता.जि. जळगांव यांनी समक्ष कार्यालयात हजर राहुन लाचेसंबधी तक्रार दिली. ती खालील प्रमाणे

मी व माझे वडीलांचा जळगांव, मन्यारखेडे येथे प्रसन्न ट्रॅव्हल्स या नावाने ट्रॅव्हल्स व्यवसाय असुन मी व माझे वडील असे दोघे सदरचा ट्रॅव्हल्स व्यवसाय येणा–या ऑर्डर प्रमाणे करीत असतो.

दि.१९.११.२०२१ रोजी माझे वडील नामे विलास नरहर देशपांडे यांनी आमच्या व्यवसायासाठी मुंबई येथुन श्री.अभिषेक धुखंडे रा.मुंबई यांच्या कडून त्यांच्या मालकीची जुनी वापरती ४९ सिटर बस विकत घेतली.विक्री केलेल्या वाहनाची कायदेशीर कागदोपत्री प्रक्रिया करुन आम्ही सदर प्रवासी बस क्र.एम.एच–०४/एफ.के.–९९२९ ही जळगांवला घेवुन आलो.

सदर गाडी आम्हाला व्यवसायासाठी वापरायची असल्याने तिचे हस्तातरण योग्यता प्रमाणपत्र व नवीन आर.सी.बुक मिळणे कामी मी दि.२२.११.२०२१ रोजी जळगांव आरटीओ कार्यालयात जावुन संबंधीत ट्रॉन्सपोर्ट विंन्डो येथे जावुन चौकशी केली. त्यानी सदर कामाबाबत ऑनलाईन फॉर्म भरा व संबंधीत वाहन निरीक्षक यांना गाडी दाखवा असे सांगितले.

त्यानंतर मला आरटीओ कार्या.समोर ऑन लाईन काम करणारे आरटीओ एजन्ट शुभम हे मला भेटले. त्यांना मी माझे कामाबद्दल चर्चा करुन आमची बस क्र.एम.एच.०४/एफ के–९९२९ हे वाहनाचे फिटनेस व वाहन नावावर करण्या बाबतची प्रक्रिया विचारली असता शुभम याने मला सदर बस संबधीत कागदपत्रांसह आर.टी.ओ. कार्यालयात आणण्यास सांगितले. त्यानुसार मी आमच्या ट्रॅव्हल्सचा ड्रायव्हर चंपालाल अमरसिंग सोळंके यास नमुद बस कागदपत्रासह आर.टी.ओ. कार्यालय जळगांव येथे घेवुन बोलावले. नमुद गाडी आर.टी.ओ.एजन्ट शुभम याने बघीतली. त्यानंतर गाडीचे कागदपत्र स्वतःच्या ताब्यात घेतले व गाडी आर.टी.ओ. कार्यालयात तपासणी साठी उभी करण्यास सांगुन संबंधीत आर.टी.ओ.अधिकारी यांचे कडून वाहन तपासणी करुन घेतो असे सांगितले. त्यानंतर मला जळगांव शहरात माझे दुसरे काम असल्याने मी ड्रायव्हर चंपालाल यास तेथे थांबवुन मी तेथुन निघुन गेलो.

थोडया वेळानंतर मी ड्रायव्हर चंपालाल यास गाडीच्या कामाचे काय झाले? असे फोन करुन विचारले असता त्याने एजंन्ट शुभम व आर.टी.ओ. साहेब गाडी चेक करुन गेले आहेत असे सांगितले. त्यामुळे मी आर.टी.ओ.एंजट शुभम यास फोन करुन संबंधीत कामाचे काय झाले? असे विचारले असता त्याने मला सांगितले की, तुमचे संबंधीत काम मी आर.टी.ओ.अधिकारी यांचेकडुन करुन देतो, त्यासाठी तुम्हाला संबंधीत आर.टी.ओ.अधिकारी यांचेसाठी १०,०००/–रु. द्यावे लागतील. माझा ट्रॅव्हलींगचा व्यवसाय असल्याने गाडी फिटनेससाठी १०००/–रु.व गाडी नावावर करण्यासाठी १०००/–रु.फि लागते यांची मला माहीती आहे.म्हणुन मी शुभम यास गाडी फिटनेससाठी व गाडी नावावर करण्यासाठी इतके पैसे लागत नाही बाबत सांगितले असता त्याने मला गाडी फिटनेसचे ५०००/–रु. व गाडी नावावर करण्यासाठी ४५००/–रु. असे ९,५००/–रु. व माझे ५००/–रु. लागतील असे सांगितले. त्यावरुन माझी खात्री झाली की आर.टी.ओ. एंजन्ट शुभम हा माझी बस क्र.एम.एच.०४/एफ. के. ९९२९ या वाहनाच्या फिटनेससाठी व सदर वाहन नावावर करण्याच्या कामासाठी लागणारी २०००/–रु शासकिय फि व त्या व्यतिरीक्त ८,०००/–रु. लाचेची मागणी करीत आहे. मी जर ती रक्कम शुभम यास दिली नाही तर तो संबंधीत आर.टी.ओ. अधिकारी यांचेकडून माझे काम करुन देणार नाही. किंवा त्यात अडथळे आणेल म्हणुन मी शुभम यास १०,०००/–रु. देतो असे फोन वर सांगुन दि.२३.११.२०२१ रोजी आर.टी.ओ.एजन्ट शुभम यांचे विरुध्द लाच मागणीची तक्रार देत आहे. तरी योग्य ती कारवाई करावी.बाबत तक्रार दिली. त्यावेळी आम्ही कार्यालयात उपस्थित असलेले पोलीस निरीक्षक एस.के.बच्छाव यांना तक्रारदार यांची तक्रार घेवुन पुढील कार्यवाही करावी बाबत सुचना दिल्या त्याप्रमाणे पोनि/एस.के.बच्छाव यांनी तक्रारदार यांची तक्रार संगणकावर तयार करुन घेतली. त्यानंतर पोनि/एस.के.बच्छाव यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले.त्यानंतर पोनि/एस. के.बच्छाव यांनी दोन्ही पंचाचा, सापळा पथकाचा व तक्रारदार यांचा आपआपसात परीचय करून दिला.

त्यानंतर दि.२३.११.२०२१ रोजी पोनि/एस.के.बच्छाव यांनी पुढील सापळा कार्यवाही जळगांव शहरातील सागर पार्कचे मोकळया मैदानात जावुन करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आम्ही, पोनि/एस.के.बच्छाव,दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकिय वाहनाने व तक्रारदार हे त्यांचे जवळील मोटर सायकलने सागर पार्क मैदानाजवळ गेलो. त्यानंतर पोनि/एस.के.बच्छाव यांनी तक्रारदार व पंच क्रं. १ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पोनि/एस.के.बच्छाव यांनी त्यांचेकडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डमधील मेमरीकार्ड मध्ये तक्रारदार व दोन्ही पंचाचे वक्तव्य घेतले. त्यानंतर सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते तक्रारदार यांचे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्रं.१ यांचेसह आर.टि.ओ.एजंट शुभम यांची भेट घेण्यासाठी जळगांव आर.

रामानंद नगर पो. स्टे. आगा-ए
CCTNS no 322/2021
भ्र.प्र.अ.सन 1988 चे कलम 7 अ व 12 प्रमाणे
स्टे.डा.नो. इ.नं. 59
02/13 वा.

पोलीस ठाणे अंमलदार
रामानंद नगर पो.स्टे.जळगाव

टि.ओ.कार्यालयाचे समोर रस्त्याच्या पलीकडे शुभम हा बसत असलेल्या ठिकाणी तक्रारदार यांचे मोटर सायकलवर पाठविले होते. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्रं. १ असे सापळा पथकाजवळ परत आले.त्यावेळी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले व पोनि/एस.के.बच्छाव यांनी पंच क्रं.१ यांना घडलेली हकीगत विचारली असता त्यांनी सांगितले की,मी व तक्रारदार असे आर.टि.ओ.कार्यालयाचे समोर रस्त्याच्या पलीकडे गेलो. सदर ठिकाणी तक्रारदार यांनी त्यांची मोटर सायकल उभी केली. त्यानंतर मी व तक्रारदार असे शुभम बसत असलेल्या ठिकाणी गेलो. सदर ठिकाणी शुभम व त्याचे सोबतचा राम पाटील नावाचा इसम असे उपस्थित होते. त्यांनतर तक्रारदार यांची आर.टि.ओ एजंट शुभम याच्याशी तक्रारदार यांचे गाडीचे फिटनेस व गाडी नावावर करण्यासंदर्भात चर्चा झाली. तेव्हा शुभम याने तक्रारदार यांचेकडे १०,०००/–रु.लाच मागणी केली.तेव्हा तक्रारदार यांनी शुभम यास एवढे पैसे लागतील का? असे विचारले असता शुभम याने फिटनेसचे ५०००/–रु. व गाडी नावावर करण्याचे असे एकुण ९५००/–रु.होतात, ५००/–रु. जास्त घेतो, तुमची इच्छा असेल तर बारा हजार द्या, असे सांगितले. तेव्हा सदर ठिकाणी उपस्थित असलेला राम पाटील नावाच्या इसमाने तक्रारदार यांना मी सगळं करायला तयार आहे, शुभमने दहा हजार रुपये सांगितले आहेत, तो तर पंधरा हजार रुपये सांगत होता असे सांगुन शुभम याने केलेल्या लाच मागणीस प्रोत्साहन देवुन सहकार्य केले. त्यानंतर तक्रारदार व मी असे मोटार वाहन निरीक्षक श्री.महाजन यांना भेटलो. तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना तुमच्या गाडीची लांबी जास्त आहे, ते काम होणार नाही असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व मी असे परत शुभम जवळ गेलो. तेव्हा शुभम यास तक्रारदार यांनी पैसे घेवुन येतो असे सांगुन मी व तक्रारदार असे सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो बाबत सांगितले. त्यानंतर पोनि/एस.के.बच्छाव यांनी तक्रारदार यांना विचारपुस केली असता त्यांनी देखील पंच क्रं.१ यांनी सांगितलेल्या हकीगती प्रमाणे मिळती जुळती हकीगत सांगितली.

त्यानंतर तक्रारदार व आर.टि.ओ एजंट शुभम तसेच राम पाटील नावाचा इसम यांचे मधील झालेले संभाषण दोन्ही पंचानी, आम्ही व पोनि/एस.के.बच्छाव यांनी ऐकले. तेव्हा पोनि/एस.के.बच्छाव यांची,आमची व दोन्ही पंच यांची लाचमागणी बाबत खात्री झाल्याने व वेळ कमी असल्याने पोनि/एस.के.बच्छाव यांनी लागलीच पुढील सापळा कार्यवाही सलगपणे करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर आर.टि.ओ.एजंट शुभम यास देण्यासाठी तक्रारदार यांनी त्यांचे घर खर्चामधुन आणलेले ८,०००/–रू. रक्कम (त्यात ५००/–रू.दराच्या १६ चलनी नोटा) पोनि/एस.के.बच्छाव यांचे समक्ष हजर केले. व तक्रारदार यांनी कळविले की, माझेकडेस सद्या ८,०००/–रु. असल्याचे कळविले. तेव्हा पोनि/एस.के.बच्छाव यांनी सदर ८,०००/–रु. व त्यांचे जवळ असलेले शासकिय २०००/–रु.दराची एक नकली नोट अशा सर्व नोटांना अ.पावडर लावणे बाबत पोकॉ/ईश्वर धनगर यांना सुचना दिल्या. त्याप्रमाणे त्यांनी सदर नोटांना अ.पा.पावडर लावुन सदरच्या नोटा तक्रारदार यांचे शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या.

त्यानंतर पोनि/एस.के.बच्छाव यांनी तक्रारदार व पंच क्रं.१ अशांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पोनि/एस. के.बच्छाव यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.१ अशांना आर.टि.ओ.एजंट शुभम याची भेट घेवुन लाच रककम देण्यासाठी जळगांव आर.टि.ओ.कार्यालयाचे समोर रस्त्याच्या पलीकडे शुभम हा बसत असलेल्या ठिकाणी तक्रारदार यांचे मोटार सायकलवर पाठविले होते.तेव्हा पोनि/एस.के.बच्छाव यांनी सदर ठिकाणी आजुबाजुस सापळा लावला होता. तेव्हा तक्रारदार व पंच क्रं. १ असे सदर ठिकाणी गेले.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांनी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास इशारा केला.

तेव्हा आम्ही, पोनि/एस.के.बच्छाव व सापळा पथक यांनी आर.टि.ओ.एजंट शुभम व राम पाटील नावाचे इसमास रंगेहाथ पकडले. तेव्हा पोनि/एस.के.बच्छाव यांचे सुचने नुसार तक्रारदार यांचे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा पोनि/एस.के.बच्छाव यांनी आर.टि.ओ.एजंट शुभम व राम पाटील नावाचे इसमास त्यांची,आमची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर पोनि/एस.के.बच्छाव यांनी प्रथम आर.टि.ओ.एजंट शुभम यास त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव .शुभम राजेंद्र चव्हाण,वय २३,व्यवसाय आरटिओ एजन्ट रा.कोल्हे हिल्स,गॅस गोडाऊन जवळ,जिजाऊ नगर,जळगांव ता. जि.जळगाव असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर पोनि/एस.के.बच्छाव यांनी राम पाटील नावाचे इसमास त्याचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव राम भिमराव पाटील,वय ३७,व्यवसाय आरटिओ एजंट रा.प्लॉट नं.१३,अनुराग स्टेट बॅक कॉलनी,महाबळ,जळगांव ता. जि.जळगाव असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर पोनि/एस.के.बच्छाव यांनी पंच क्रं.१ यांना सापळा पथकापासुन रवाना केल्यानंतरची हकीगत विचारपुस केली असता पंच क्रं.१ यांनी सांगितले की, मी व पंच क्रं.१ असे सापळा पथकापासुन तक्रारदार यांचे मोटार सायकलने रवाना होवुन मी व तक्रारदार असे आर.टि.ओ.कार्यालयाचे समोर रस्त्याच्या पलीकडे गेलो. सदर ठिकाणी तक्रारदार यांनी त्यांची मोटर सायकल उभी केली.त्यानंतर तक्रारदार व मी असे आर.टि.ओ.एजंट शुभम व राम पाटील नावाचा इसम हे उपस्थित असलेले ठिकाणी गेलो. तेव्हा आर.टि.ओ.एजंट शुभम याने तक्रारदार यांना उजव्या हाताचा पहीला बोट व अंगठयाने पैशांचा इशारा केला तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे शर्टचे वरील डाव्या बाजुच्या खिशात असलेले १०,०००/–रुपये (त्यात २०००/–रु.दराची ०१ नकली नोट व ५००/– रुपये दराच्या १६ चलनी नोटा) लाच रक्कम तक्रारदार यांनी उजव्या हाताने बाहेर काढुन सदरची रक्कम आर.टि.ओ.

एजंट शुभम यांचे समोर धरली व तक्रारदार यांनी शुभम यास पेसे देतो आहे, काम डिले नको करु असे सांगितले असता आर.टि.ओ.एजंट शुभम याने जवळच उभा असलेला इसम राम पाटील याचेकडेस अंगुलीनिर्देश करुन या भाउच्या हातात द्या असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी शुभम यास त्याला दिले काय, तुला दिले काय, काम व्यवस्थित व्हायला पाहीजे असे सांगुन सदर लाचेची रक्कम आर.टि.ओ.एजंट शुभम याचेकडे दिली. तेव्हा शुभम याने सदर लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारली. तेव्हा सदर लाच रक्कमेमध्ये एक २०००/—रु.दराची नोट नकली असल्याचे शुभम याचे लक्षात आले व त्याने हि नोट नकली असल्याचे सांगितले. बाबत हकीगत सांगितली. त्यानंतर पोनि/एस.के.बच्छाव यांनी तक्रारदार यांना विचारपुस केली असता त्यांनी देखील पंच क्रं.१ यांचे सांगण्या प्रमाणे मिळती जुळती हकीगत सांगितली.

त्यानंतरची सापळा कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये शुभम राजेंद्र चव्हाण, तक्रारदार व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर पुढील उर्वरीत सापळा कारवाई पोनि/एस.के.बच्छाव यांनी केली आहे. तसा सलगपणे सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी क्रं.१.शुभम राजेंद्र चव्हाण याने दि.२३.११.२०२१ रोजी पंचासमक्ष तक्रारदार यांच्या गाडीचे फिटनेससाठी व गाडी नावावर करण्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन तसेच आपल्या वैयक्तीक प्रभावाचा वापर करुन तक्रारदार यांचेकडेस १०,०००/—रु. लाच मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी शुभम राजेंद्र चव्हाण याने दि.२३.११.२०२१ रोजी १६.२९ वा. जळगांव आर.टि.ओ.कार्यालयाचे समोर रस्त्याच्या पलीकडे एका झाडाखाली तक्रारदार यांचेकडुन स्वत: स्विकारली तसेच आरोपी क्रं.२ राम भिमराव पाटील यांनी सदर अपराधास सहाय्य करुन प्रोत्साहन दिले. म्हणुन माझी आरोपी शुभम राजेंद्र चव्हाण व आरोपी राम भिमराव पाटील यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अ व १२ प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

पोलीस ठाणे अंमलदार
रामानंद नगर पो.स्टे.जळगाव

फिर्यादीची सही
24.11.21

शशिकांत श्रीराम पाटील
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव